दै. पुढारी दि. 02/09/2024

# कुंटूर येथे गोदामावर पोलिसांचा छापा

## आता बालकांच्या खाऊवरही डल्ला; अंगणवाडीतील पोषण आहारचा काळाबाजार उघड



**नांदेड, पुढारी वृत्तसेवा :** कृष्णूर धान्य घोटाळ्यानंतर आता महिला व बालविकास विभागाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्रावरील गरोदर माता आणि लहान मुलांना वाटप करण्यात येणारा घरपोच आहार थेट खासगी गोदामात पोहोचविला जात असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत कुंटूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत कुंटूर फाटा येथील रजवी नवाज हुसेन अब्दुल बारी यांच्या ताज ट्रेडर्स गोदामामध्ये तूरडाळीच्या एक हजार बॅग, ५०० बॅग चना, ८०० बॅग अरकळ, ५०० बॅग सोयाबीन अशा वेगवेगळ्या धान्याच्या दोन हजार ८०० बॅग्स पोलिसांनी जप्त केल्या आहेत. त्यामुळे या मोफत वाटप करण्यात्या येणाऱ्या आहाराचा काळाबाजार उघडकीस आला असून, यात कोणकोणते अधिकारी, कर्मचारी सहभागी आहेत, याचा पोलिस आता कसून शोधन घेत आहेत.

कुंटूर फाटा येथील गोदामामध्ये अत्यावश्यक मालाची साठवणुक केल्याची माहिती पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार यांना गुप्त बातमीदारामार्फत समजली. त्यानंतर त्यांनी पथक तयार करून, त्यांना सदर गोदामाची पाहणी करण्याच्या सूचना दिल्या. पथकात पोलिस अधिकारी, अमलदार, कुंटूर पोलिस तसेच नायगावचे बाल प्रकल्पाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, पुरवठा अधिकारी यांचा समावेश होता. पथकाला कुंटूर फाटा येथील रजवी नवाज हुसेन अब्दुल बारी यांच्या गोदामात शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्रावर गरोदर माता आणि लहान मुलांना वाटप करण्यात येणाऱ्या आहाराचा साठा आढळून आला.

**पोलिसांचा लागणार कस**

**कृष्णूर धान्य घोटाळ्यानंतर आता बालकांच्या खाऊवरही डल्ला मारला जात आहे. या घोटाळ्याची माळेमुळे किती खोलवर रुजले आहेत. त्यात स्थानिक अधिकाऱ्यांसह जिल्हास्तरावरील अधिकारीही सहभागी आहेत का, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांचा कस लागणार आहे. परिणामी गरोदर माता आणि बालकांच्या तोंडचा घास पळविणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई होईल का, असा प्रश्न आता उपस्थित होतो आहे.**

**गोदामातून जप्त केलेला पुरवठा**

- १००० बॅग तूर
- ५०० बॅग चना
- ८०० बॅग अरकळ
- ५०० बॅग सोयाबीन
- १२० पोते तांदूळ

त्यामध्ये अंगणवाडीचा खाऊ १४५ पाकीट, २० बॅग तांदूळ, १५ बॅग गहू तसेच एका आयचर वाहनामध्ये १२० पोते तांदूळ, गहू, चना, सोयाबीन तर दुसऱ्या दोन आयचरमध्ये ८०० पोते चना आणि इतर धान्य आढळले. तसेच एका अटोमध्ये चार पोते तांदूळ असा साठा जप्त करण्यात आला. सदर गोदामाला पोलिसांनी सील केले असून, तीन आयचर आणि एक ऑटो पोलिसांनी मालासह जप्त केले आहे.